e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024

SK International Journal of Multidisciplinary Research Hub

Journal for all Subjects

Research Article / Survey Paper / Case Study

Published By: SK Publisher

(www.skpublisher.com)

*A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal*

Special Issue: Two Day National Interdisciplinary Conference on "Script Writing"

Organised by: Department of Languages, Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.

(Sponsored by Pradhan Mantri Uchchatar Shiksha Abhiyan Grants to Strengthen Colleges)

# पटकथेचे घटक,पटकथेच्या दृश्यसंहिता (स्क्रीन प्ले)

**सुरेखा बाबुराव नागरे**[१]
संशोधक विद्यार्थिनी,
मराठी विभाग
के.टी.एच.एम. महाविद्यालय,
नाशिक

**प्रा. डॉ. पौर्णिमा बोडके**[२]
संशोधक मार्गदर्शक
मराठी विभाग
के.टी.एच.एम. महाविद्यालय,
नाशिक

**DOI:** https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.49

***गोषवारा:*** *चित्रपट कला एक कला आणि एक मनोरंजनाचे माध्यम म्हणून माणसाच्या अधिक जवळचे आहे स्थापत्यकला, मूर्तीकला, चित्रकला, नृत्यकला, शिल्पकला, साहित्यकला, या सर्व ललितकलांना आपल्यामध्ये समाविष्ट करून घेणारी चित्रपट एक व्यापक कला आहे. चित्रपट हे यंत्र युगातील माध्यम आहे. चित्रपट हे माध्यम लिखित संहितेला कॅमेरा)दृश्यक( माध्यमाच्या सहाय्याने दृश्य प्रतिमेत रूपांतरित करते. लिखित साहित्य चित्रपटाचा गाभा असून तिला पटकथा असे संबोधण्यात येते.पटकथा लेखनामध्ये नवनवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहे. पटकथा लेखन म्हणजे गोष्टीला दिलेले संवादात्मक रूप, डिजिटल प्लॅटफॉर्म संवादातून गोष्टी सांगणे सोयीचे होते. फेसबुक, युट्युब, व्हिडिओज, लघुपट, माहितीपट यासाठी पटकथा लेखनाचा वापर केला जात आहे. पटकथा लेखन सारखे विषय अध्ययनात समाविष्ट केलेले आहे. विद्यार्थ्यांना पटकथा लेखनातून रोजगाराच्या संधी दिसू लागल्या आहे. या दृष्टीने पटकथेचे स्वरूप, पटकथेचे महत्त्व, पटकथेचे घटक, दृश्यसंहिता यांची मांडणी प्रस्तुत शोधनिबंधामध्ये केली आहे.*

**प्रस्तावना -**

पटकथा हा लेखनाचा एक प्रकार आहे“ .मूळ कथा वस्तू तशीच ठेवून तिचे चित्रपटांसाठी,मालिकांसाठी संवादात्मक तसेच रचनात्मक रूपांतरण केल्यानंतर जे बनते ते पटकथा होय.”पटकथा हे चित्रपटाचे महत्त्वाचे अंग असते. कोणत्याही चित्रपटाचे पटकथा लेखन महत्त्वाचे असते. दिग्दर्शकाकडे एक कथा असते ,कथेतून पटकथेचा जन्म होतो .चित्रपट म्हणजे अर्थपूर्ण दृश्यांची संहिता होय. चित्रपट निर्मितीत अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे पटकथा होय.चित्रपटाचा आत्मा म्हणून पटकथेला ओळखले जाते.

© 2024, SK Publisher All Rights Reserved

**उद्दिष्टे;**

१( चित्रपटातील पटकथांचे स्थान अभ्यासणे .

(2कथा आणि पटकथा यामधील अंतर अभ्यासणे.

३( पटकथेची निर्मिती घटकांच्या माध्यमातून होते याचे विश्लेषण करणे .

४ (दृश्य संलग्नता हे पटकथेचे वैशिष्ट्य आहे हे अभ्यासणे.

**पटकथा स्वरूप, संकल्पना**

लिखित दृश्य संहितेला पटकथा म्हणतात. संवादाच्या माध्यमातून दृश्य रुपात सांगितलेली नाट्यात्मक कथा म्हणजे पटकथा होय. पटकथा ही चित्रपटाचा आत्मा असून .पटकथेशिवाय चित्रपट अपूर्ण आहे .भावनिर्मिती,आशयपूर्ण कथानक,दृश्यात्मकता,संवादात्मकता इत्यादी पटकथेचे वैशिष्ट्य आहे .पटकथेवर चित्रपटाचे यश अवलंबून असते, पटकथेमध्ये कथाबीजांचे दृश्यानुसंधान महत्वाचे असते, अनेक दृश्यांच्या सहाय्याने कथा विस्तारते आणि परिपूर्ण आकृतीबंध पूर्ण होतो. प्रसिद्ध पटकथाकार ग.रा .कामात पटकथे संदर्भात लिहितात " पटकथा लिहिताना पटकथाकाराला सीन कसा दिसेल याचा विचार करावा लागतो ,नुसते शाब्दिक वर्णन उपयोगात नसल्याचे सांगून ते पुढे म्हणतात प्रत्येक सीन ही जणू छोटी स्वयंपूर्ण कथाच असते, त्याला केंद्रबिंदू असतो, शेवट असतो .या शेवटचा पुढच्या सीनचा उगम असतो .पटकथेतला प्रत्येक सीन हा केवळ माहिती वजा न होता मनोरंजनात्मक व्हावा लागतो त्यातून प्रेक्षकांची उत्सुकता वाढवीत न्यावी लागते, पटकथा ही अनेक दृश्यांची मालिका असून त्यातील प्रत्येक दृश्य हे परिपूर्ण आकृतीबंध असतो. पटकथा लेखन करताना प्रेक्षक हा महत्वाचा मानावा लागतो, त्याप्रमाणे पटकथेची रचना केली जाते. लिखित पटकथा शब्द माध्यमातून प्रकटत असते. चित्रपट या माध्यमाची गरज म्हणून पटकथा लिहिली जात असल्यामुळे या माध्यमातून भाषेच्या स्वरूपाचा पटकथेच्या अभिव्यक्तीवर परिणाम होतो .पटकथेच्या संरचनेत दृश्य प्रतिमा महत्वाची असते म्हणजेच प्रतीक/ चिन्ह महत्वाचे असते .पटकथा ही कथाबीजांचे दृश्यानुसंधान असते . पंटकथा ही दृश्य माध्यमातून अभिव्यक्त होणारी चित्रपटाच्या सांगाड्याची संहिता असते, कथाबीजातून दृश्यमाध्यमाच्या साहाय्याने बदलत जाणारी रचना पटकथेच्या रूपाने दिसते. कथा १ ते ५ पानांची असते, तीच पटकथेत मांडली जाते तेव्हा ७० ते ८० दृश्य तयार होतात .त्यात महत्वाची पात्रे असतात त्याचबरोबर इतर जे पात्रे असतात ती सुद्धा कथा फुलविण्याचे काम पटकथेच्या माध्यमातून करत असतात. त्या पात्रांचे स्वभाव कसे आहे हे पटकथेतून उलगडत असते पंटकथाकाराला पटकथा लिहिताना सुरुवात, मध्य आणि शेवट कुठे करायचा याची काळजी घ्यावी लागते, प्रेक्षकांची उत्कंठा कशी वाढेल यावरही पटकथाकारला विचार करावा लागतो.

पटकथा लेखक चित्रपट नायक प्रधान अथवा नायिका प्रदान करावयाचा आहे ही भूमिका ठरवूनच लेखन करत असतो . पटकतेचा विषय राजकीय,सामाजिक, कौटुंबिक, पौराणिक, ऐतिहासिक, रहस्यमय असे ठरवूनच त्यातील मुख्य व्यक्तिरेखा, उपव्यक्तिरेखा, घटना, प्रसंग प्रारंभ, सुरुवात आणि शेवटची मांडणी करत असतो. चित्रपटाचा विषय कोणताही असला तरी

त्यामध्ये शारीरिक संघर्ष, भावनिक स्पंदने, आंदोलने, उत्कंठावर्धक जिज्ञासा, रंजकप्रधान, रहस्यमय इत्यादी वैशिष्ट्य समोर ठेवून चित्रपट पटकथा निर्मिती केली जाते.

**कथा व पटकथा**

कथा ही कितीही दर्जेदार असली, तरी स्वतंत्र पटकथेची गरज भागवू शकत नाही ,पटकथाकार कथेवर आधारित स्वतंत्र पटकथा तयार करतो .'नटरंग' या कादंबरीवर आधारित चित्रपटासाठी रवी जाधव यांनी स्वतंत्र पटकथा लिहिली आहे .'बनगरवाडी' या चित्रपटाची पटकथा व्यंकटेश माडगूळकर यांनी लिहिली आहे .'जोगवा' चित्रपटाची पटकथा संजय पाटील यांनी लिहिली आहे. चित्रपट ही मुळात पाहण्याची कला आहे वाचन्याची नाही,चित्रपटाचे कितीही प्रभावी वर्णन त्याच्या प्रत्यक्ष दृश्या अनुभवाची जागा घेऊ शकत नाही. चित्रपटाच्या अनुषंगाने प्रकाशित केले जाणारे प्रचलित साहित्यरुप म्हणजे चित्रपटाची पटकथा ,चित्रपट ही एक कला म्हणून रूढ व्हायला लागल्यापासून त्याच्या प्रेक्षकवर्गातही त्याबद्दलची जाण समृद्ध होऊ लागली आहे .पटकथा ही केवळ शब्द संहिता नसते त्या शब्दातून ध्वनिघटकांची कल्पना करणे ही त्यात असते.

**पटकथांचे घटक-**

**दृश्यानुसंधान-** पटकथा ही अनेक दृश्यांची बनलेली असते. एकामागून एक दृश्य प्रतिमांचे संकलन एकसंधपणे करावे लागते . चित्रपटातील प्रत्येक दृश्याला स्वतंत्र अर्थ व अस्तित्व असतो. तो अर्थ दुसऱ्याशी दृश्याशी निगडीत असतो, अशा अनेक अर्थपूर्ण दृश्यांमधून चित्रपटांची संरचना निर्माण होते. दृश्य संलग्नता हे पटकथेचे वैशिष्ट्ये आहे.

**कथानक** – कादंबरीतील, चित्रपटातील आणि पटकथेतील महत्वाचा घटक म्हणजे कथानक, गोष्ट. कथेला दृष्ट्यांच्या माध्यमातून मांडण्यासाठी पटकथा महत्वाची असते ,कथानकाला सुरुवात मध्य व शेवट असावा असे अपेक्षित असते, ज्या कथानकाद्वारे गोष्टींचे कथन केले जाते त्या कथानकातून चित्रपटाची रचना स्पष्ट होते. कथाबीजांचा होणारा विस्तार चित्रपटाच्या विस्तार दर्शवितो तो विस्तार पटकथेच्या स्वरूपात असताना वेगवेगळ्या दृष्ट्यांच्या सहाय्याने मांडला जातो. पाश्चात्य लेखक, पटकथाकार सीड फिल्ड च्या मतानुसार पटकथा तीन अभिनय संरचनेचे अनुसरण करते म्हणजे पटकथा तीन भागांमध्ये विभागली जाते जाऊ शकते. सेटअप, संघर्ष आणि रिझॉल्युशन त्यांच्या मते पटकथेत सुरुवातीला कथाबीजांची उभारणी मध्यंतरामध्ये संघर्ष उभा करणे आणि अंतिम टप्प्यांमध्ये कथा बीजांचे पृथ्थकरण करून कथानकाचा विकास केला जातो. पण हा संघर्ष त्यामागील पार्श्वभूमी यशस्वीपणे मांडून दृश्यांच्या स्वरूपात चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांत लोकांपर्यंत पोहोचवून तो चित्रपट यशस्वी करण्याचे कौशल्य संपूर्णत: पटकथाकारावर अवलंबून असते.

**स्वभाव रेखाटन** – पटकथेमध्ये असलेल्या विविध पात्रांच्या स्वभावाचे रेखाटन कथाबीजाला साजेसे होणे गरजेचे असते. स्वभाव रेखाटन मध्ये कथानकाचा विकास करणाऱ्या पात्रांचा आलेख स्पष्ट केलेला असतो.कथा, कादंबरी चित्रपट यामध्ये कथानक व स्वभावरेखन या दोन घटकांना अत्यंत महत्वाचे स्थान आहे. स्वभाव रेखानातून व्यक्त केली जाणारी कथा स्वभावरेखनाच्या नैसर्गिक विकासामुळे प्रेक्षकांची जवळीक साधते, प्रभावी स्वभावरेखन रेखाटनातून पटकथेची उत्कृष्टता व

© 2024, SK Publisher All Rights Reserved

परिणामकारकता ठरते, म्हणजे कथेत येणारे स्वभावरेखन हे कथाबीजांचा विकास करते. कथा विकास पावताना पात्रांचे सामाजिक स्थान, त्यांचे राजकीय व इतर रूपबंधातील महत्त्व त्या पात्रांची पार्श्वभूमी, स्वभाव वैशिष्ट्ये त्यांच्या लकबीसह होणाऱ्या विकासाची नोंद ठेवलेली असते.

**संवाद –** संवादातून मानव आपल्या भावभावना व्यक्त करत असतो .भावभावना व्यक्त करण्यासाठी शब्द या ध्वनीमार्फत मानव संवाद साधत असतो. संवाद हा आशय प्रकटीकरणाचे प्रभावी माध्यम आहे. पात्रांचे स्वभावरेखन करण्यासाठी आपापसातील व्यवहार साधण्यासाठी संवादाची गरज असते, या संवादातून पटकथेतील पात्रांच्या भावभावनांचा आविष्कार होतो .पटकथाकाराने संवाद लिहिताना चित्रपटातील कोणते पात्र बोलते याचे भान ठेवणे महत्त्वाचे असते ,बोलणारा राजा आहे की जनता शिक्षक आहे की अशिक्षित व्यक्ती याचा विचार करून त्या त्या व्यक्तींना साजेशी संवाद लिहिले पाहिजे पटकथाकाराला संवाद चित्रपटासाठी आहे की नाटकांसाठी याचाही विचार करावा लागतो, चित्रपटात संवादापेक्षा पात्रांच्या हालचालींना महत्त्व असते, आपल्या शरीर माध्यमातून पात्रे स्वतःच्या भावना व्यक्त करतात नाटकात मात्र शब्द सर्व काही असतात. चित्रपटातील संवादाद्वारे कथा अभिव्यक्त केली जाते पटकथेमध्ये येणारे संवाद हे दृश्य माध्यम असून तेथे दृश्य प्रतिमेला महत्त्व असते, चित्रपटात येणारे संवाद कथानकाचा विकास करण्यासाठी, चित्रपटाची गतीमानता स्पष्ट करण्यासाठी तसेच पात्रांच्या स्वभावरेखानाच्या दिशा निश्चित करण्यासाठी फक्त आधार म्हणून उपयोगी येतात. भारतीय चित्रपट सृष्टीत स्वतंत्र संवाद लेखक असतात, तर कथा ,पटकथा यांचा विस्तार करणारा पटकथा लेखक स्वतंत्र म्हणून अस्तित्वात असतो .मराठी चित्रपटांच्या बाबतीतही पटकथातील दृश्यांमध्ये लिहिलेल्या निवेदना मधून अन्य संवादलेखक योग्य ते संवाद लिहितात, तरीही संवाद हा पटकथेचाच घटक म्हणून महत्त्वाचा मानवा लागेल. पटकथे शिवाय संवादलेखन अशक्य आहे या संवादाच्या परिणामकारकतेवर पटकथा अधिक प्रभावी बनविता येते.

**पटकथा गीत** – प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी त्यांची अभिरुची जोपासण्यासाठी चित्रपटात गीते महत्त्वाची असतात. लेखकाला पटकथा बांधणीमध्ये आलेले अपयश किंवा अडचणी सोडवण्यासाठी गीते सांधेजोडीचे काम करतात. चित्रपटातील गाणी योग्य स्थानी प्रसंगाशी अनुरूप असेल तर ती पटकतेच्या दृश्यांना बांधून सहजतेने कथा पुढे सरकत नेणारी असावी, कथेशी सुसंगत असावी म्हणजेच चित्रपटात येणारी गाणी पटकथेचा आकृतीबंध परिपूर्ण करणारी असावी असे मत पुरुषोत्तम बेर्डे यांनी व्यक्त केले आहे.

**प्रतीके** – प्रतीक म्हणजे चिन्ह, पटकथेचा विकास होत असताना जर तो आशयाभिमुख अथवा कथानकानुसार होत असेल, तर त्या त्या विषयानूसार पटकथेच्या दृश्य प्रतिमा येत असतात. काही वेळेला चिन्हकित दृश्य प्रतिमेच्या सहाय्याने चित्रपटातील आशय प्रकट करावा लागतो .प्रतीक म्हणजे चिन्ह हे चिन्ह म्हणजे प्रतिनिधित्व करणारी एखादी वस्तू किंवा घटना उदाहरणार्थ 'दशक्रिया' चित्रपटातील पाण्यात सोडली जाणारी नाणी किंवा 'चानी' चित्रपटात आप्पा बामणाने चानीला दिलेले पैंजण प्रेमाचे प्रतीक म्हणून येते,'जैत रे जैत 'मध्ये मंगळसूत्र न वापरता लग्नासाठी काळा दोरा मंगळ्सूत्राचे प्रतीक म्हणून येते,'कुंकू'

चित्रपटातील घड्याळ, आरसा हे उदाहरणादाखल सांगता येतील. चित्रपटातील आशय प्रभावीपणे मांडण्यासाठी अशा प्रतीकांचा वापर कोणत्याही संवादाविना जास्त प्रभावी ठरतो.

**दृश्यसंहिता** – चित्रपटाचे लिखाण हे सूजनात्मक लिखाण असते, कथा,पात्र,प्रसंगाची नाट्यमय रचना, स्थळकाळाची रचना या घटकांचा निर्मितीक्षम विचार संहितेत होतो, तसा तो कथा आणि कादंबऱ्यांमध्येही होतो परंतु संहितेच्या लिखाणाचा हेतू तंत्र आणि तिचे रूप याबाबतीत ती वेगळी ठरते. कथा कादंबरी नाटक यांचा निव्वळ वाचनातून पूर्ण आस्वाद घेता येतो, तसे संहितेत नाही संहिता ही अंतिम निर्मिती नाही, चित्रपट निर्मिती व्यवहारातला तो एक महत्त्वाचा टप्पा आहे. संहितेमध्ये एक तत्व गृहीत असते की लेखकाने जे काही लिहिले आहे ते दिग्दर्शक त्यांच्या परीने दृश्यांमध्ये बदलणार आहे ती दृश्य ते प्रसंग नटाच्या वाटे अभिनित आणि कॅमेराद्वारे चित्रित होणार आहेत आणि नंतर त्यावर संकलन आणि ध्वनी संस्कार होणार आहे याचाच अर्थ असा होतो की, दिग्दर्शक,कॅमेरामन, नट ही मंडळी एकाच संहितेला आपापल्या दृष्टिकोनामधून उपयोग करतात. संहिता ही दिग्दर्शक, नट,कॅमेरामन यांच्यासाठी लिहिलेली असते प्रेक्षकांसाठी नाही. चित्रपट संहितेचा साहित्यासारखा आस्वाद घेता येईल का याचा विचार करता पटकथेचा एक वेगळा रुपबंध असतो .पटकथेच्या संदर्भात प्रसिद्ध पाश्चात्य पटकथाकार जाँ क्लोद म्हणतात " पटकथाकाराने दृश्य लिहिताना कधी कधी चक्क अशी दृश्य स्वतः करून पाहिली पाहिजेत कारण पटकथाकाराला मुळात आधी सिनेमा दिसायला पाहिजे. उगाचच दृश्यांमधून दृश्य लिहीत जाणे याला काही अर्थ नाही दृश्यमूल्य तपासून पाहण्याची क्षमता पटकथाकाराने स्वतःमध्ये विकसित केली पाहिजे," पुढे ते असेही म्हणतात की अधून मधून पटकथा काराने प्रेक्षकाच्या भूमिकेतून आपण लिहिलेल्या दृश्याकडे पाहिलं पाहिजे त्याचा उपयोग परिणामकारकता वाढविण्यासाठी निश्चितपणे होते.

**निष्कर्ष** -

१ (पटकथेची भाषा दृश्यात्मक असते.

२( पटकथा हा चित्रपटाचा आत्मा आहे ,दर्जेदार पटकथा चांगला चित्रपट निर्माण करून शकतात.

३ (पटकथा लेखन आणि चित्रपट क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत.

४ (कादंबरीची भाषा ,संवाद लांब लचक असतात, कादंबरीचा आवाका विस्तृत असतो, परंतु चित्रपटामध्ये मात्र वेळेचे बंधन असते .पटकथेची भाषिक मांडणी प्रतिमांच्या दृश्य रुपातून अधिक प्रभावी होते .

५ (पटकथेचा हेतू हा चित्रपट निर्मितीसाठी आवश्यक संहिता असल्याने सृजनात्मक अनुभूती देत असूनही पटकथा सृजनात्मक निर्मिती राहत नाही.

६ (चित्रपटात येणारी गीते मनोरंजनासाठी तसेच व्यावसायिक तडजोड म्हणून येत असून पटकथेच्या आकृतीबंधावर गीतांचा परिणाम होतो.

© 2024, SK Publisher All Rights Reserved

## संदर्भ

चित्रपट एक कला- विजय दिक्षित,रेणुका प्रकाशन, पुणे

चित्रभाषा- मराठी चित्रपट संहिता -निलेश महिगावकर,इर्जिकप्र काशन,सातारा

मराठी चित्रपटची पटकथा –डॉ.अनिल सपकाळ,अनुबंध प्रकाशन,पुणे

कुंकू ते दुनियादारी -डॉ.राजेंद्र थोरात,चपराक प्रकाशन,पुणे

:::. Cite this article .:::

नागरे, सुरेखा बाबुराव. & बोडके, प्रा. डॉ. पौर्णिमा. (2024). पटकथेचे घटक,पटकथेच्या दृश्यसंहिता (स्क्रीन प्ले). Two Day National Interdisciplinary Conference on Script Writing, 245–250.

https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.49